**विशेष दिवाणी दावा क्र.८७/२०२२.**
**नि.क्र. ४६.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ कस्तुरी रमेश सोनवणे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. एस. एस. दुर्शींग यांचेमार्फत शपथेवर सुरु :-**

**०१.** सदरच्या प्रकरणांत मी पुरावाकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो. **नि.क्र. ४६** वर आहे. सदर प्रकरणात मी दस्त यादी नि.क्र.४५ अन्वये वादी रमेश सोनवणे यांनी माझ्या हक्कात करून दिलेले जनरल मुखत्यारपत्र दाखल केले असुन त्यावर माझी व वादी रमेश यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६०** देण्यात येते. तसेच मी दस्त यादी नि.क्र.५१ अन्वये खरेदीखत दस्त क्रमांक ६६५४ ची प्रमाणित प्रत दाखल केली असुन त्यावर लिहुन देणार म्हणुनवादी रमेश सोनवणे व आशाबाई थोरात व लिहुन घेणार म्हणुन अभिजीत ढोले व सत्यम वारे यांच्या सह्या व अंगठा असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी वादी रमेश यांची सही ओळखते कारण ते माझे पती आहेत. त्यामुळे, सदर खरेदीखतास **नि.क्र.६१** देण्यात येते. तसेच मी सदर प्रकरणात गट क्रमांक १५०१ चा ७/१२ उतारा दाखल केला असुन त्यास **नि.क्र. ६२** देण्यात येते. तसेच मी सदर प्रकरणात ग्रामपंचायत साकुर येथील मालमत्ता क्रमांक १७३ चा उतारा दाखल केला असुन त्यास **नि.क्र.६३** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**सर्व प्रतिवादी क्र. १ व २ तसेच त्यांचे वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे उलटतपास काहीही नाही.**

**प्रतिवादी क्र. ३ तर्फे प्रकरण एकतर्फा असल्यामुळे उलटतपास काहीही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.** **श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA — Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA Date: 2026.02.23 18:08:47 +0530

JOSHI PRASAD BALKRISHNA — Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA Date: 2026.02.23 18:08:43 +0530

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**
**दि. २३/०२/२०२६.**

**( प्रसाद बा. जोशी )**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**